GR-20040806132129001-1201

जिल्हा परिषदांना द्यावयाच्या आस्थापना अनुदानासाठी महाराष्ट्र कोषागार नियम १९६८, खंड-१ मधील नियम १५३ (१०) चे शिथिलीकरणाबाबत.

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : विपअ-१००३/प्र.क्र.१४१/२००३/कोषा-प्र-१.
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २५ सप्टेंबर २००३

वाचा : (१) शासन अधिसूचना, वि.वि. क्र.:मकोनि-१०९५/प्र.क्र.१६०/९५/कोषा-५, दि.१९.६.१९९९.
(२) शासन निर्णय, वि.वि. क्र.:मकोनि-२००२/प्र.क्र.१४३/२००२/कोषा-प्र-५,दि.१५.४.२००२.
(३) शासन निर्णय, वि.वि. क्र.:मकोनि-२००२/प्र.क्र.१४३/२००२/कोषा-प्र-५,दि.६.८.२००२.

शासन परिपत्रक :

जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांचे वेतन वितरण वेळेवर करणे जिल्हा परिषदांना शक्य व्हावे याकरिता शासनाकडून त्यांना प्रदान केले जाणारे आस्थापना अनुदान वेळेवर व नियमितपणे उपलब्ध होणे गरजेचे आहे. तथापि प्रशासकीय विभागाकडून आस्थापना अनुदान मंजुरीचे आदेश वेळेवर निर्गमित होत नाहीत असे लक्षात आल्यानंतर शासनाने उपरोक्त शासन निर्णय दिनांक ६.८.२००२ अन्वये असे आदेश दिले की आस्थापना अनुदान जरी वेळेवर प्राप्त झाले नाही तरी केवळ त्याकरिता [illegible] जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांना वेतन मिळण्यास विलंब होऊ नये म्हणून या प्रयोजनार्थ सादर होणाऱ्या देयकांकरिता एक विशेष बाब म्हणून महाराष्ट्र कोषागार नियम १५३ (१०) शिथिल केला आहे. हे शिथिलीकरण आर्थिक [illegible] न मिळालेल्या आस्थापना अनुदानासाठी लागू [illegible] असा निष्कर्ष [illegible] आहे. सबब शासन आता याद्वारे असा खुलासा करत आहे की हे शिथिलीकरण [illegible] पुढील आदेशापर्यंत लागू आहे.

महाराष्ट्र कोषागार नियम १५३ (१०) चे शिथिलीकरण काही विशेष उद्देशाने केलेले आहे. या विशेष सवलतीचा वापर करताना अर्थसंकल्पीय तरतुदीचे, अर्थसंकल्पीय शिस्तीचे उल्लंघन होणार नाही याची काळजी घेण्याची जबाबदारी संबंधित जिल्हा परिषदांची देखील आहे. प्रशासकीय विभाग ज्या योजना जिल्हा परिषदांकडे सोपवित आहेत त्या योजनांसाठी मंजूर कर्मचारी वर्गाच्या आस्थापना अनुदानाची [illegible] वित्त विभागाने मंजूर करून घेऊन त्या अनुदानाची रक्कम उपलब्ध करून देणे ही प्रशासकीय विभागाची जबाबदारी आहे. संबंधित योजना व त्यासाठी मंजूर कर्मचारी वर्ग किती [illegible] मंजूर आहे याची माहिती संबंधित जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असणे आवश्यक आहे. याच आधारे त्यांनी म.को.नि. १५३ (१०) खालील शिथिलीकरणाचा वापर करावयाचा आहे. तथापि अनुदान उपलब्ध करून घेण्याची जबाबदारी [illegible] असल्याने प्रशासकीय विभागाकडे सतत पाठपुरावा करून व अनुदान प्राप्त करून घेणे ही जबाबदारी त्यांची आहे. याचप्रमाणे

योजनांसाठी मंजूर आस्थापना अनुदान वेळेत जि. परिषदांना उपलब्ध करून देणे ही जबाबदारी प्रत्येक प्रशासकीय विभागाची आहे. शासन स्तर योजनेत बदल होणे किंवा ती बंद करणे यामुळे मंजूर आस्थापना अनुदानात कोणताही बदल होत असेल तर प्रशासकीय विभागाने जिल्हा परिषदांना याबाबत त्वरित माहिती दिली पाहिजे. या जबाबदारीमध्ये कसूर झाल्याने अनियमित खर्च झाल्यास, त्यास प्रशासकीय विभाग तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी हे दोघेही जबाबदार असतील.

३. आस्थापना अनुदान मंजुरीचे आदेश जिल्हा परिषदांकडे वेळेत पोहोचावेत यासाठी शासनाने एकत्रित मंजुरी आदेश निर्गमित करण्याची विशेष सवलत देऊन दिलेली आहे. तरीही याचा वापर काही प्रशासकीय विभाग करत नाहीत त्यामुळे परिणामतः वेतन वितरणास विलंब होतो असे शासनाच्या निदर्शनास आले आहे. प्रशासकीय विभागांच्या या कार्यपध्दतीमुळे त्यांच्याच योजनांवर काम करणारे कर्मचारी असंतुष्ट राहिल्यास योजनांची अंमलबजावणी प्रभावित होऊ शकते. याची नोंद घेणे गरजेचे आहे. सर्वप्रकारच्या विशेष सवलती दिल्यानंतरही आस्थापना अनुदानाचे वितरण विलंबाने होत असल्याबाबत तक्रारी आल्यास त्याची जबाबदारी संबंधित प्रशासकीय विभागाची असेल.

४. आस्थापना अनुदानाची देयके कोषागारात वेळेत सादर झाल्यासच जिल्हा परिषदांच्या कर्मचाऱ्यांना वेतन वितरण वेळेत होणे शक्य आहे. ही देयके कोषागारात वेतन वितरणाच्या विहित दिनांकापेक्षा किमान पाच कामाचे दिवस आधी कोषागारात सादर होतील याची मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दक्षता घेतली पाहिजे व देयके योग्य असल्यास त्यांचा धनादेश, देयके प्राप्त झाल्यापासून तीन दिवसात निर्गमित होईल याची दक्षता कोषागार कार्यालयाने घेतली पाहिजे. कोणतीही योजना यशस्वी करण्यासाठी सर्व संबंधितांनी आपआपली कामगिरी चोख व जबाबदारीने पार पाडणे गरजेचे आहे. यात कसूर झाल्यास संबंधित उचित कारवाईस पात्र ठरतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

गी. जो. रसाळ
शासनाचे उप सचिव.

प्रत,

राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे व उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १, महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) २, महाराष्ट्र, नागपूर.
प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा) १, महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल (लेखा परीक्षा) २, महाराष्ट्र, नागपूर.
महालेखापाल (वाणिज्यिक लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
मुख्य लेखापरिक्षक, स्थानिक निधि लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.
सर्व उप मुख्य लेखापरिक्षक (जिल्हा), स्थानिक निधि लेखा, कोकण विभाग,
औरंगाबाद/अमरावती/नागपूर